# दरपत्रक मागविण्याची तिसरी वेळ

17 FEB 2018

जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/झेरॉक्स मशिन - वार्षिक दरकरार/ 1747 /२०१८ अमरावती शहर दिनांक -

**संदर्भ** :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/झेरॉक्स मशिन वा. दरकरार/७७७/२०१८ दि. १८/१/२०१८
२. या कार्यालयाचे पत्र क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/झेरॉक्स मशिन वा. दरकरार/१२९९/२०१८ दि. ०२/२/२०१८

**विषय** :- या आस्थापनेवरील २५-शॉर्प, ०१-किलबर्न तसेच ०२- कॅनॉन झेरॉक्स मशिनचा साहीत्यासह दुरूस्ती देखभाल वार्षिक दरकरार करणे करीता दोन लिफाफा पध्दतीनुसार तिसरी वेळेस दरपत्रके सादर करणे बाबत.

-oooo-

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरून कळविण्यात येते की, या आस्थापनेवरील सर्व पोलीस स्टेशन (१०-पो.स्टे.) तसेच सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ/गाडगेनगर/फ्रेजरपुरा/शहर वाहतुक विभाग, पो.नि. श.वा.शा., महीला सेल, पोलीस मुख्यालय, पोलीस आयुक्तालयातील सर्व शाखा/विभाग, इत्यादी ठिकाणी कार्यरत असलेल्या शार्प/किलबर्न/कॅनॉन झेराक्स मशिनचा साहीत्यासह सन २०१८ करीता वार्षिक दुरूस्ती व देखभाल करण्याकरीता उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये अधिकृत कंपनी विक्रेता/पुरवठादार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात आले होते. तथापि पहील्या वेळेस तांत्रिक कागदपत्रामुळे दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडता आला नाही. पुन्हा दुसरी वेळेस एकही दरपत्रक प्राप्त झाली नाही.त्यामुळे दरकराराची पुढील प्रक्रिया राबविता आली नाही. करीता पून्हा तिस-यांदा (तिसरी वेळेस) दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी ईच्छूक अधिकृत विक्रेते/पुरवठादारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंध दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत दिनांक २६/०२/२०१८ ला १२.०० वाजेपर्यंत पर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्रा-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्रा-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे अनिवार्य आहे. तांत्रिक लिफाफ्यामध्ये (विवरणपत्रा-१) खालील आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. पुरवठादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र
२. पॅन कार्डची छायांकीत प्रत
३. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
४. कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र
५. झेरॉक्स मशिनकरीता नेमण्यात येणा-या अधिकृत तज्ञांचे नांव व त्यांची शैक्षणीक पात्रता प्रमाणपत्र व अनुभवबाबत कागदपत्रे

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्र-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. तसेच विवरणपत्र-२ मध्ये शार्प,किलबर्न व कॅनॉन मशिनचा वार्षिक दुरूस्ती व देखभाल बाबत वार्षिक दरकराचे प्रतीमहा वेगवेगळे दरपत्रक व त्यासोबत अधिकृत कंपनीची शार्प/किलबर्न/कॅनॉन मशिनमध्ये टाकावयाचे सर्व स्पेअरपार्ट /टोनर ची अधिकृत कंपनीची यादी व प्राईजलिस्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे, सदरचे पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

(एम.एच.बैस)
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

**प्रति,**

१. मे. श्वेता ट्रेडींग कंपनी, काजी कंपाऊंड, मालटेकडी रोड, अमरावती.
२. दत्तात्रय सिस्टीम, गुंडेवार कॉम्प्लेक्स, २ रा माळा, शंकर नगर, नागपुर
३. ------------------------------------------

**प्रत,**

१/- पोउपनि, सायबर सेल,
२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत प्रबंधक शाखेत सादर करावी.

आवक क्रमांक 683/२०१८
96/02/२०१८



Scanned by CamScanner